# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**-- परिपत्रक --**

क्र.संगाबाअवि /1/109/2-343/2020 दिनांक - 24.3.2020

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना....... संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ दि.31.3.2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत.**

संदर्भ - 1) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिपत्रक .संगाबाअवि/1/109/2-340/2020 दिनांक 22.3.2020

2) मा, सचिव, भारत सरकार मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.21.3.2020 चे पत्र,

3) मा.सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे एफ.क्र.1-14/2020 (वेबसाईट) दि.21.3.2020 चे पत्र,

4) सहसंचालक (उच्च शिक्षण) म.रा. पुणे यांचे पत्र क्र.उशिसं /कोरोना/ मवि-1/ 2020/3819/ 4042 दि.23.3.2020.

5) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे पत्र क्र.संगाबाअवि/1/109/2-341/2020 दिनांक 23.3.2020

6) सहसंचालक (तंत्रशिक्षण),विभागीय कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.विकाअ /शिक्षण/ 2020 /877 दि.23 मार्च, 2020.

7) मा.जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांचे संचारबंदीचे आदेश क्र.कक्ष-27 कलि/गृह विभाग/144 आदेश/कावि-246/2020 दि. 23.3.2020

8) मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर, अमरावती यांचे आदेश क्र.पोआअ /विशा / कोरोनामनाईआदेश /923/ 2020 दि.23.3.2020.

कोरोना विषाणुचा (कोव्हीड-19) प्रादूर्भाव/प्रसार होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून दि.25.3.2020 पर्यंत विद्यापीठ परिसर बंद ठेवणेबाबत मा.कुलगुरूंचे आदेश उपरोक्त संदर्भ क्र.1 वरील परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात असून उपरोक्त संदर्भ क्र.2 ते 4 वरील पत्रांबाबत कार्यवाही करण्यास संदर्भ क्र.5 वरील पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.2 ते 4 वरील पत्रांन्वये प्राप्त निर्देश लक्षात घेता, **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग आणि विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा दिनांक 31.3.2020 पर्यंत बंद राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी**. तसेच सदर पत्रान्वये प्राप्त सूचनांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

या कालावधीत सर्व अधिकारी, शिक्षक, संशोधक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुख्यालय न सोडता घरी बसूनच (work from home) आवश्यक असेल ती प्रशासकीय व शैक्षणिक कामे करावीत. विशेष म्हणजे शिक्षक व संशोधकांनी या कालावधीत ऑनलाईन कंटेन्ट विकसित करावे. सोबतच ऑनलाईन अद्यापन व ऑनलाईन मूल्यमापन करावे. पुढील सत्र व शैक्षणिक साहित्य तयार करावे, संशोधन लेख, पेपर व इतर बाबींवर भर द्यावा. तसेच नावीन्यपूर्ण प्रश्नांची बँक तयार करावी.

कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात, अमरावतीमध्ये गतीने पसरत आहे. या पार्श्वभूमीवर मा.जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांनी संदर्भ क्र.7 अन्वये **संचारबंदीचे आदेश** निर्गमित केलेले आहेत.

त्याचप्रमाणे मा.पोलीसआयुक्त, अमरावती शहर यांनी उपरोक्त संदर्भ क्र.8 अन्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन 1973 कलम 144(1)(3) प्रमाणे दिनांक 23.3.2020 चे 18.00 ते दि. 31.3.2020 चे 24.00 वा. चे दरम्यान कोणत्याही व्यक्तीला अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही रस्त्यांवर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यांवर, गल्लोगल्ली याठिकाणी **जमावबंदी, कोणत्याही प्रकारचे वाहन वापरास व वाहतुकीस मनाई आदेश** निर्गमित केले आहेत. सदर आदेशाचे सुद्धा काटेकोरपणे पालन करावे.

टीप - कोरोना संदर्भात विद्यापीठाद्वारे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना व शासन आदेश विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या वेबसाईटवर Corona Impact : Important Notices & Circulars या लिंकवर कृपया पहाव्यात.

- आदेशान्वये,

डॉ.तुषार देशमुख
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,
1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
2) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा
3) प्राचार्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये **यांना माहितीकरिता**.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
1) मा, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32
2) मा.संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
3) सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
4) सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती
5) सहसंचालक (तंत्र शिक्षण), विभागीय कार्यालय, अमरावती.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**
**कॅम्प अमरावती ४४४ ६०२**
**(गृह विभाग)**
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/१४४ आदेश/कावि-२४६/२०२० दिनांक :- २३/०३/२०२०

**वाचा :-** १.आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४५/२०२०दि. २३/०३/२०२०
४. शासनाकडील सूचना पत्र No. DMU/२०२०/CR. ९२/DisM-१, Dated :- २३/०३/२०२०

**आदेश**

ज्या अर्थी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात तसेच राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अमरावती जिल्हयातील गर्दीच्या ठिकाणी विषाणू एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्ती पर्यंत पसरु नये तसेच अमरावती शहर व ग्रामीण जिल्हयात अशा वेळी लोकांमध्ये वेगवेगळे तर्क वितर्क निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होणार नाही याकरीता नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

त्या अर्थी अमरावती जिल्हयामधील शहरी व ग्रामीण भागांमध्ये सर्व शाळा/कॉलेज, सिनेमागृहे, आठवडी बाजार, साप्ताहीक बाजार, जनावरांचे बाजार, उत्सव, जत्रा, इ. बंद ठेवण्याकरीता व प्रतिबंध घालण्यासाठी तसेच सर्व संबंधितांना नोटीसेस देऊन त्यांचे म्हणने ऐकून घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये आदेश पारीत करणे इतपत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी अमरावती फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अमरावती शहरातील व अमरावती जिल्हयामधील शहरी व ग्रामीण भागांमध्ये या आदेशानुसार **खालीलप्रमाणे संचारबंदीचे आदेश पारीत करीत आहे.**

१. शहरी व ग्रामीण भागामध्ये पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांनी, जमावाने एकत्रीत जमू नये. अनावश्यकरित्या कोणत्याही नागरिकांनी कारणाशिवाय शहरात व गावात शिरु नये वा फिरु नये व त्यांनी त्यांचे घरात वास्तव्य करावे.
२. अमरावती शहरातील व अमरावती जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील हददी बंद करण्यात येत आहे. यामधील अत्यावश्यक वस्तु व नाशवंत पदार्थांसाठी सदरचा आदेश लागू होणार नाही.
३. सर्व प्रकारची सार्वजनिक वाहतूक त्यात शहर बस सेवा वरही बंदी घालण्यात येत आहे. विशेष कारणांसाठी टॅक्सी मधील दोन प्रवाशी चालकांसह व ऑटोरिक्षा मधील एक प्रवाशी चालकासह यांना वाहतूकीसाठी परवानगी राहील तथापी वाहतूक सेवा वैद्यकीय सेवेसाठी व आपात्कालीन सेवांसाठी मुभा देण्यात येत आहे. खाजगी वाहनाला एक प्रवासी व चालकांसह अत्यावश्यक वस्तुसाठी व आरोग्य सेवांसाठी व इतर कार्यवाहीसाठी मुभा राहील.



Scanned by CamScanner

४. कोरोना व्हायरस च्या अनुषंगाने कोणत्याही नागरिकाने समाजामध्ये अफवा, अपप्रचार, व भिती निर्माण होईल अशा प्रतिक्रिया व्हॉटसअॅप, फेसबुक, व्टिटर, इंस्टाग्राम, वृत्तपत्र, सोशल मिडीया व होर्डींगस इत्यादी व्दारे प्रसिध्द व प्रक्षेपित व प्रसारित करु नये.

५. कोरोना व्हायरस चा अपप्रचार होईल या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे व्हिडीओ, फोटो प्रसारित करुन अफवा पसरवू नये तसेच कोणत्याही विशेष प्रकारे महाआरती, समुहपठण, धर्मपरिषदांचे आयोजनाच्या कृत्य व विधी करु नये.

६. मिरवणूका, सभा, रॅली, सामुहिक कार्यक्रम, भाषणबाजी, उदघोषणा यांना या आदेशाव्दारे प्रतिबंध घालण्यात येत आहे.

७. यामध्ये सर्व प्रकारची धार्मिक स्थळे, प्रार्थनास्थळे यांना सुध्दा सदरचा आदेश लागू राहील.सदर प्रार्थना स्थळांवर प्रार्थना, पुजाअर्चा ५ पेक्षा कमी व्यक्तींव्दारा सुरु राहील पण अशी धार्मिक स्थळे भाविकासाठी दर्शनार्थ व इतर विधीकरीता बंद राहतील.

८. अमरावती जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व प्रकारच्या ट्रॅव्हल्स, खाजगी बसेस, खाजगी सर्व प्रकारची वाहतूक, एस. टी. बसेसची सेवा तसेच महानगरपालीका हददीतील बस सेवा व जिल्हयातील ऑटो रिक्षा ची सेवा नागरिकांसाठी बंद राहील. परंतु आपत्कालीन परिस्थितीत व रुग्णांच्या सेवेसाठी नागरिकांसाठी ऑटो रिक्षा ची सेवा व स्वत:चे खाजगी वाहनाची सेवा घेण्याची मुभा राहील.

९. अमरावती जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागांतील आठवडी व साप्ताहीक बाजार हे बंद राहतील.

१०. जिवनावश्यक व अत्यावश्यक कारणांसाठीच जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागांत वाहतूकीची सेवा सुरु राहतील. यातील जिवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणारे ट्रक, मोटारे व रिक्षा वाहने यांची सेवा वगळण्यात येत आहे.

११. शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये आवश्यक त्या कामांकरीता शासकीय अधिकारी/कर्मचारी शासनाने दिलेल्या निर्देशान्वये केवळ ५ टक्के कर्मचारी उपस्थितीसाठी वगळण्यात येत आहे.

१२. ज्या नागरिकांचे विलगीकरण केले आहे व ज्यांच्या हातावर शिक्के आहेत त्यांनी पुढील १५ दिवस घराबाहेर पडु नये व घरात सुध्दा वेगळे राहावे. नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीमध्ये आरोग्य सेवा साठी व रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्यासाठी वगळण्यात येत आहे.

१३ सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहित कारणांशिवाय येण्यास मनाई राहील.

१४.नागरिकांना आवश्यक असणाऱ्या जिवनावश्यक वस्तुंचा साठा अथवा काळा बाजार करण्यात येऊ नये, तसेच सदर जिवनावश्यक वस्तु हया वाढीव दराने व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क आकारणी करुन काळा बाजार करुन नये यासाठी सुध्दा निर्बंध करण्यात येत आहे.

१५.सदर संचारबंदीमध्ये सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वा. पर्यंत धान्य, किराणा, फळे, भाजीपाला यांची विक्री व खरेदीसाठी नागरिकांना शिथिलता देण्यात येत आहे धान्य, किराणा, फळे, भाजीपाला यांची विक्री ही स्थानिक स्वराज्य संस्था यांनी ठरवून दिलेल्या ठिकाणावरच करावी तसेच सदर ठिकाणी १०० मीटर परीसरामध्ये ५ पेक्षा जास्त किरकोळ विक्रेते असणार नाही याची दक्षता यावी. व सदरची वेळ मर्यादा औषधी केंद्र, रुग्णालये यांना लागू राहणार नाही.

१६. सर्व प्रतिष्ठाने सोने-चांदीची दुकाने, कापड, ऑटो मोबाईल, भांडयाची दुकाने, इलेक्ट्रीक-इलेक्ट्रॉनीक्स, टिंबर, प्लायवुड, मोबाईल दुकाने, सलुन, ब्युटी पार्लर, गॅरेज, हॉटेल्स, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट, लॉज, ढाबे,



Scanned by CamScanner

चहा-नाश्ता प्रतिष्ठाने, पानटपरी, जलतरण उद्यान, बगीचे, मॉल्स, कोचिंग क्लासेस, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा, खाजगी गोदामे, कारखाने, उद्योग केंद्र व इतर व्यावसायीक प्रतिष्ठाने सदर संचारबंदीमध्ये बंद राहील तथापी औषधींचे व वैद्यकीय उपकरणे निर्माण करण्याचे सहनियंत्रण, उद्योग, प्रक्रिया यांना लागू राहणार नाही तसेच तांदुळ व दाळ, अन्नधान्य, दुग्ध उत्पन्नाचे व इतर अत्यावश्यक वस्तुंचे निर्मीती करणारे उद्योग यांना मुभा राहील.

१७. शासकीय कार्यालये, दुकाने व प्रतिष्ठान सदर संचारबंदीचे शिथिलताचे कालावधीत कमीत कमी कर्मचारी यांचा वापर करेल व कामातील कार्यालयामध्ये कमीत कमी ३ फुटांचे अंतर एकमेकांपासून ठेवावे व परिसरात स्वच्छता व हात धुण्याकरीता सुविधा उपलब्ध कराव्या.

अमरावती जिल्हयाच्या सिमेवरुन प्रवेश करणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करण्याकरीता अमरावती जिल्हयालगत असलेल्या सर्व सिमावर्ती ठिकाणी पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांनी नाकेबंदी करुन प्रवेश करण्याकरीता प्रतिबंध करावा. तसेच पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांनी अमरावती शहरामध्ये प्रवेश करणारी वाहने ही शहराच्या सिमेवर रोखून त्यांची नाकेबंदी करावी व त्यांना शहरात येण्यापासून प्रतिबंध करण्यात यावा. यामध्ये जिवनावश्यक वस्तुंची (पेट्रोलिअम पदार्थ, दुध, भाजीपाला, औषधी, धान्य, वैद्यकीय उपकरणे, प्रसारमाध्यमे इ.) वाहतूक करणारी वाहने वगळण्यात यावी. जिल्हा, शहर व गावचे कार्यक्षेत्रातुन आवश्यक व तातडीच्या वैद्यकीय, जिवनावश्यक व आपात्कालीन परिस्थिती व्यतीरिक्त नागरिक व वाहनांना बाहेर जाण्यास व आत प्रवेश देऊ नये अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व प्रकारची प्रवासी व माल वाहतुक करणारी वाहने, बस, खाजगी कार, टॅपो ट्रॅव्हलर, ट्रक, काळी पिवळी जिप, अशी सर्व हलकी, मध्यम व अवजड वाहने, शेअर रिक्षा, दुचाकी अशा सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात यावा. सदर आदेशाची अंमलबजावणी करतांना पोलीस विभागाने प्रादेशिक परिवहन विभाग, महामार्ग पोलीस विभाग यांचेशी समन्वय साधून कार्यवाही करावी.

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता व प्रतिबंध होण्याकरीता आवश्यक उपाययोजना म्हणुन अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी व अशा प्रकारची कारवाई ही संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांनी तात्काळ त्यांचे स्तरावरुन करावी.



Scanned by CamScanner

**यामध्ये खालील दुकाने व प्रतिष्ठान अत्यावश्यक वस्तु व सेवांसाठी वगळण्यात येत आहे.**

१. बँक, एटीएम केंद्र, विमा, वित्तीय तांत्रीक सेवा व त्याला लागून इतर सेवा.
२. प्रिंटर, इलेक्ट्रॉनिक मिडीया,
३. माहिती व तंत्रज्ञान त्यातील टेलीकॉम, पोस्टल, इंटरनेट व डाटा सर्व्हिसेस
४. अत्यावश्यक वस्तुची पुरवठा व वाहतुकीस संबंधित साखळी
५. आयात व निर्यात, कृषी माल, उत्पादने व इतर वस्तु ची सेवा.
६ .अत्यावश्यक वस्तु त्यातील धान्य, औषधी व वैद्यकीय उपकरणे, ई कॉमर्स व्दारे डिलीव्हरी करणे
७. धान्य, किराणा वस्तु, दुध, भाजीपाला, फळे अंडे, मटण, मासे, यांचे विक्री व वाहतूक आणि साठवण करण्यासाठी सर्व क्रिया
८. बेकरी व पाळीव जनावरांचे खाद्य पदार्थचे प्रतिष्ठाने
९. घरपोच जेवण/खाद्य पदार्थ पोहचविणारे प्रतिष्ठाने व त्यांचे सेवाधारी
१०. रुग्णालये, औषधी व चष्माघरे यांचे निर्माता/वितरक व त्यासंबंधी वाहतूकीची सेवा
११. पेट्रोल पंप, एलपीजी गॅस, ऑईल एजन्सी व त्यांचे गोडाऊन व त्यांची वाहतूकीची सेवा
१२. सर्व प्रकारचे सुरक्षा व सुविधा व्यवस्थापन सेवा त्यामध्ये अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या खाजगी यंत्रणाची सेवा.
१३. कोरोना व्हायरस ला प्रतिकार करण्यासाठी खाजगी प्रतिष्ठानांची सेवा
१४. सर्व कायदेशीर बलगटाने फक्त नागरिकांचे हालचाली यांना प्रतिबंध करावे व त्यांचे अत्यावश्यक वस्तु व सेवा यांना प्रतिबंध करु नये.
१५. कोरोना व्हायरस संबंधित रुग्णांना सेवा देणारे खाजगी व शासकीय रुग्णालये, त्यातील वैद्यकीयची सेवा

सदरचे संचारबंदीचे आदेश हे आज दिनांक २३/०३/२०२० चे २१.०० वा. पासून ते ३१/०३/२०२० चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक २३/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI.

(शैलेश नवाल) २३/३
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

प्रतिलिपी:-

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस.

**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**



Scanned by CamScanner

३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

६. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

८. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

९. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता

१०. उपविभागीय दंडाधिकारी ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.

११. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अमरावती ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

१२. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत --------------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

१३. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांना माहिती व उचित प्रसिध्दीकरीता रवाना.
**/- सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**

१४. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१५. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

१६. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

१७. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.

१८. संबंधित सर्व विभाग -----------------------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI.

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**



Scanned by CamScanner

महत्वाचे


# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.

( विशेष शाखा )

कार्यालय दुरध्वनी क. – (0721) 2551009 फॅक्स – (0721) 2551010

Email - Sb.cpamt@mahapolice.gov.in, Website- http://www.amravaticitypolice.org


क्रमांक :–पोआअ/विशा / कोरोनामनाईआदेश/९२२ /२०२०, अमरावती, दिनांक २३/०३/२०२०

विषय :– फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक २३.०३.२०२० चे १८.०० ते दिनांक ३१.०३.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान वाहन वापरास व वाहतुकीस मनाई आदेश

***

1. ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात, अमरावतीमध्ये गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस आयुक्त, कार्यालय, अमरावती शहर यांचेकडील जा. कं. ९२१/२०२०,दिनांक २२.०३.२०२० अन्वये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात आहे.
2. परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होवू शकते. याबाबत माझी खात्री झालेली आहे. त्याअनुषंगाने सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या वाहतूकीस मनाई करण्यासाठी स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामानिमित्त अमरावती शहरात प्रवेश करणारे यांना उदेशुन आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.
3. महाराष्ट शासन, राजपत्र असाधारण भाग – १ मध्ये उप–विभाग यांचेकडील अधिसुचना कमांक ३ मधील पान कं. ४ मधील फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ चा कं. एमएससी–१२७४/व्ही–एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३(II-1974) चे कलम २१ अन्वये पोलीस आयुक्त यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.
4. त्याअर्थी, मी, संजयकुमार बाविस्कर, पोलीस आयुक्त, अमरावती शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही रस्त्यांवर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यांवर, गल्लोगल्ली याठिकाणी सायकल तसेच पारंपारीक व व अपारंपारीक इंधनावर चालणा–या मोटार सायकल (गिअरसह/शिवाय), सर्व प्रकारच्या तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतूकीची वाहने यांचा प्रवास व वाहतूक यासाठी वापर करण्याची मनाई करणारा आदेश दिनांक २३.०३.२०२० चे १८.०० वा. ते ३१.०३.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान लागू करीत आहे.
5. या आदेशाने खाजगी प्रवासी वाहने तसेच सर्व प्रकारच्या रिक्षा, टॅक्सी (ॲप आधारीत ओला, उबर व तत्सम वाहनांसह) या सर्वांना वाहतूकीस मनाई करण्यात येत आहे.

6. सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाहीत. –

१. पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित (फक्त कर्तव्यार्थ )

२. तातडीने रुग्ण वाहतूक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरा मेडीकल स्टॉफ (फक्त कर्तव्यार्थ )

३. अत्यावश्यक सेवा उदा. विज, पाणी पुरवठा, दुरसंचार, अग्निशमन, बॅक व एटीएम, राष्टीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पायाभूत विकासाशी संबधित उद्योग ( फक्त कर्तव्यार्थ व तातडीचे असल्यास)

४. जिवनावश्यक सेवा, वस्तु व माल याची वाहतूक

५. प्रसार माध्यम व त्यांचे प्रतिनिधी (फक्त कर्तव्यार्थ )

६. माझेवतीने व जिल्हाधिकारी, अमरावती यांनी परवानगी दिलेले व्यक्ती यासाठी पुढील दुरध्वनी संपर्क ०७२१–२५५१००० अथवा ई मेल **cro.cpamt@mahapolice.gov.in** यावर लेखी संपर्क साधावा.

[ टीप – १. वर नमुदप्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यसाठी असलेले नेमणुकी बाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

२. राज्यातील महत्वाची शहरांना एकमेकाशी जोडणारे मार्ग जे अमरावती शहरातून जातात अशा मार्गावरील वाहतूकीतील बदलाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील. ]

7. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजाविणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परीमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझे सही शिक्यानिशी आज दिनांक २३.०३.२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण – अमरावती
दिनांक २३.०३.२०२०

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

(संजयकुमार बाविस्कर)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर